ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ | पुणें, बुधवार तारीख ३१ डिसेंबर, १९५२ | अंक ५०

## विविध माहिती

**चांदी गाळण्याची भट्टी**—कलकत्ता येथें उभारण्यांत याव-याची चांदी गाळण्याची भट्टी १९५४ अखेर काम करूं लागेल अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. ह्याच भट्टींतून 'इलेक्ट्रोलिटिक कॉपर' हि गाळण्यांत येईल असें समजतें. १९५३ अखेर डेहराडून येथें हैड्रोग्राफिक सर्व्हे ऑफिस सुरू करण्यांत येणार आहे.

**अमेरिकेसाठी ब्रिटिश रणगाडे**—अमेरिकेनें ब्रिटनकडून 'सेंच्युरिअन' ह्या प्रकाराचे रणगाडे विकत घेण्याचें ठरविलें आहे. ९ कोटी पौंड किंमतीच्या रणगाड्यांची नोंदणी नुकतीच ब्रिटिश कारखान्यांकडे करण्यांत आली आहे. हे रणगाडे हॉलंड व डेन्मार्क ह्या देशांना पुरविण्यांत येणार आहेत.

**हत्तीचा प्राचीन दांत**—ब्रिटनमधील नॉर्थ बेडफोर्डशायर-मध्यें १२,००० वर्षांपूर्वीच्या हत्तीचा दांत सापडला आहे. ह्या दांताची लांबी ९ फूट असून व्यास दोन इंच आहे. फार प्राचीन काळीं मॅमॉथ नांवाच्या हत्तींची जात होती. त्यापैकीं एकाद्या हत्तीचा हा दांत असावा.

**भारतामधील पहिला रेल्वे-रस्ता**—भारतामधील पहिला रेल्वे-रस्ता १६ एप्रिल १८५३ ह्या दिवशीं मुंबई ते ठाणें ह्यांच्या दरम्यान चालू झाला. हें अंतर सुमारें २२ मैल आहे. आज भारतीय रेल्वे रस्त्यांची लांबी ३४,१२३ मैल आहे. भारतीय रेल्वे दर मिनिटाला ६४,००० प्रवाशांना वाहून नेत असतात.

**सायन्स काँग्रेसचा खर्च**—लखनौ येथें २ जानेवारी १९५३ रोजीं सायन्स काँग्रेसचें ४० वें अधिवेशन भरणार आहे. ह्या अधिवेशनासाठी ६०,००० रुपये खर्च येईल. काँग्रेसची स्वागत-समिति ३०,००० रुपये गोळा करणार आहे. उत्तरप्रदेश सरकारा-कडून कांहीं आर्थिक साह्य मिळविण्याची खटपट चालू आहे.

**चहाच्या उत्पादनांत कपात**—भारतामधील उत्तरेच्या व दक्षिणेच्या चहाच्या मळेवाल्यांची परिषद् कलकत्ता येथें नुकतीच भरली होती. सर्व मळेवाल्यांनीं येत्या वर्षांत चहाच्या उत्पादनांत ८ टक्के कपात करण्याचें ठरविलें आहे. ह्या निर्णयाला अनुसरून भारतामधील चहाचें उत्पादन ६२ कोटी पौंडांऐवजीं ५७ कोटी पौंड करण्यांत येईल.

**आहाराची तपासणी**—मध्यप्रदेश सरकारच्या आहाराधि-कार्‍यांनीं राज्यांतील प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या आहा-राची तपासणी केली असतां अर्ध्यापेक्षा अधिक मुलांच्या आहा-रांत अ, ब २ आणि कॅलशिअम ह्यांचा अपुरा पुरवठा असल्याचें आढळून आलें.

**पूर्व बंगालमधून आलेले निर्वासित**— पूर्व बंगालमधून आलेल्या निर्वासितांची पुनर्वसाहत करण्यासाठी उत्तर प्रदेश सरकारनें ७०,००० एकर पडीक जमीन लागवडीखालीं आण-ण्याचें ठरविलें आहे. जमिनींत तागाची लागवड करण्यांत येईल.

**मध्यप्रदेशांतील वृत्तपत्रें**—मध्यप्रदेशांत हल्लीं १४१ नियत-कालिकें निघतात. त्यांपैकीं ७० हिंदी, ४१ मराठी आणि १८ इंग्रजी आहेत. आठ वर्षांपूर्वी अवघीं ६९ नियतकालिकें प्रसिद्ध होत असत. त्यांपैकी ३२ हिंदी, १५ मराठी आणि १३ इंग्रजी होतीं.

**उत्तरप्रदेशाचा जंगलवाढीचा कार्यक्रम**—उत्तरप्रदेश सर-कारनें राज्यांतील जंगलांची वाढ करण्यासाठी पंचवार्षिक कार्य-क्रम आखला आहे. ह्या कार्यक्रमाप्रमाणें २६,९०० एकर जमि-नींत झाडें लावण्यांत येतील. राज्यांतील जंगलानें ११,००० चौरस मैल क्षेत्र व्यापलें आहे. आणखी ४,००० चौरस मैल क्षेत्रांत जंगल वाढविण्यांत येणार आहे.

**कारवारमध्यें टेलिफोन एक्सचेंज**—कारवार शहरांत लवकरच टेलिफोन एक्सचेंजची स्थापना करण्यांत येणार आहे असें समजतें. कमींत कमी ४० सभासदांची जरूर असल्यानें पोस्ट-खात्यातर्फे स्थानिक व्यापार्‍यांकडे आणि इतरांकडे ह्यासंबंधी विचारणा करण्यांत येत आहे.

**मुंबई राज्य सहकारी परिषद्**—खैरा जिल्ह्यांतील आनंद येथें मुंबई राज्यसहकारी परिषद् ता. ३, ४ व ५ एप्रिल १९५३ ह्या दिवशीं भरविण्यांत येणार आहे. गुजराथ विभाग को-ऑपरेटिव्ह बोर्ड परिषदेची तयारी करण्यासाठी लवकरच एक बैठक घेणार आहे.

**संशोधन संस्थेला मदत**—हैद्राबाद येथील सेंट्रल लॅबोरे-टरीज फॉर सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्च ह्या संस्थेला संशोधनकार्यासाठी भारतीय सरकारकडून ५ लाख रुपयांची मदत देण्यांत आली आहे.

**अमेरिकन तांदळाची निर्गत**—तांदळाची निर्गत करणाऱ्या देशांत अमेरिकेचा अनुक्रम आतां तिसरा लागतो; थायलँडचा पहिला आणि बर्माचा दुसरा आहे. दुसऱ्या महायुद्धापूर्वी अमेरिकेंत जेवढा तांदूळ होत आहे, त्याच्या दुप्पट पिकूं लागला आहे. आशियाकडे तांदूळ पाठविणारे इतर देशहि ( इजिप्त, ब्राझील, इटली व ऑस्ट्रेलिया ) पूर्वीपेक्षा जास्त तांदळाचें उत्पादन करीत आहेत. जपान व भारत हे देश तांदूळ आयात करणाऱ्या देशांत अग्रेसर आहेत.

**शैक्षणिक चित्रपटांची निर्मिति**—भारतीय सरकार सोळा मिलिमीटरचे शैक्षणिक चित्रपट स्वतःच काढणार आहे असें समजतें. ह्या चित्रपटांच्या प्रती कांहीं आकार घेऊन राज्य-सरकारांना त्यांच्या सामाजिक शिक्षणाच्या कार्याला मदत म्हणून मिळूं शकतील. त्याशिवाय, शिक्षण-विषयक कार्य करणाऱ्या संस्थांनाहि ते मिळतील. दृकूशिक्षणाला उत्तेजन देण्याचें सरकारचें धोरण आहे.

**वापरलेल्या मोटारींची आयात**—स्वतःच्या उपयोगासाठी वापरण्यांत यावयाच्या मोटारी आयात करण्याबद्दलचे नियम भारतीय सरकारनें शिथिल केले आहेत. ता. १ एप्रिल, १९५३ पासून प्रवासी लोकांना चार महिने परदेशी वापरलेल्या मोटारी भारतांत आणतां येतील. मात्र त्या सुलभ चलनाच्या देशांतील असल्या पाहिजेत. आतांपर्यंत ६ महिने वापरलेल्या गाड्याच आणतां येत असत.

**चीनसाठी खोबरेल तेल**—सीलोन सरकारचें एक व्यापारी-मंडळ पेकिंगला वाटाघाटीसाठी गेलें आहे. उभयतां देशांत करण्यांत आलेल्या कराराप्रमाणें चीन सीलोनकडून १०,००० टन खोबरेल तेल विकत घेणार आहे. किंमत अजून कळलेली नाहीं.

**शिखांचें एंजिनिअरिंग कॉलिज**—लुधिआना येथें नानकाना शीख एंजिनिअरिंग कॉलेज काढण्याचा निर्णय शिरोमणि गुरुद्वार प्रबंधक कमिटीनें घेतला आहे. कमिटीचे अध्यक्ष श्री. प्रीतमसिंग ह्यांनीं १० लाख रुपयांची वर्गणी जमल्याचें जाहीर केलें आहे. गिल नांवाच्या एका खेड्यांतील लोकांनीं जमीन देण्याचें कबूल केलें आहे.

**लंडनमध्यें हिंदूंचें मंदिर**—सुप्रसिद्ध भारतीय योगी श्री. राव ह्यांनीं लंडनमध्यें हिंदूंचें मंदिर बांधण्याचें ठरविलें आहे. ह्या कामासाठी एका फ्रेंच बाईकडून त्यांना १,००,००० पौंडांची देणगीहि मिळाल्याचें समजतें. ह्यापूर्वी एका इंग्रज गृहस्थानें ७५,००० पौंड देणगीदाखल दिले आहेत. फ्रेंच बाई ह्या योगाच्या अभ्यासक आहेत.

**पूर्वरचित घरांच्या कारखान्याचा लिलांव**—भारतीय सरकारनें पूर्वरचित घरांचा एक कारखाना काढण्याचें ठरवून ८० लाख रुपयांची यंत्रसामुग्री व इतर साहित्य परदेशाहून आणलें होतें. आतां ह्या कारखान्याचा नाद सोडून देण्यांत आला असून त्याचा लिलांव करण्यांत येणार आहे. मूळ किंमतीच्या २० टक्केच किंमत वसूल होण्याचा संभव आहे.

**विमान कंपन्यांना मदत**—भारतीय विमान वहातूक कंपन्या आपल्या ठरीव मार्गांवर विमानें चालविण्यासाठी जितकें पेट्रोल वापरतील त्याच्या प्रत्येक गॅलनमागें ६ आणे इतकी आर्थिक मदत भारतीय सरकार देणार आहे, असें अधिकृत रीत्या सांगण्यांत आलें आहे.

**समाज विकास योजनांना मदत**—उत्तर प्रदेशांतील समाज विकास योजनांना पुढीलप्रमाणें खताचा पुरवठा करण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे:—३०० टन अमोनिअम नैट्रेट, १०० टन युरिआ, १,००० टन अमोनिअम सल्फेट आणि ५,००० टन नैट्रेट फॉस्फेट.

**आरोग्य संघटनेची मदत**—उत्तर प्रदेशांतील तराई विभागांत नव्यानें वसविण्यांत आलेल्या वसाहतींत हिंवतापाची साथ पसरली आहे. तेथील जनतेच्या आहाराचें परीक्षण करण्यासाठी जागतिक आरोग्य-संघटनेचा एक तज्ज्ञ येणार आहे असें समजतें.

'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

१९५२ मूल्यमापनाचें वर्ष १९५२

दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कंपनी लि.

पहिल्या मूल्यमापनांत कंपनीनें बोनस जाहीर केलें आहे. येत्या मूल्यमापनांतील बोनसचे भागीदार होण्यासाठीं, आजच पॉलिसी घ्या.

सर्वत्र एजन्सीज देणें आहेत.

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर

दि
युनायटेड कमर्शिअल बँक लि.

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६७½ लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला ( चेअरमन )

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोएंका व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| वैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :
बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

# अर्थ

बुधवार, ता. ३१ डिसेंबर, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## "अर्था" ची १८ वर्षांची सेवा

"अर्थ" साप्ताहिकाची स्थापना जानेवारी, १९३५ मध्यें प्रोफेसर वा. गो. काळे ह्यांनीं केली. तेव्हांपासून महाराष्ट्रीय आर्थिक व्यवसायांची सेवा "अर्थ" वक्तशीर व कार्यक्षमतेनें करीत आला आहे. १८ व्या वर्षाचा हा शेवटचा अंक असून पुढील अंक १९ व्या वर्षाचा पहिला अंक म्हणून प्रसिद्ध होईल.

महाराष्ट्रीयांना आर्थिक विषयांची गोडी लागावी, त्यांना आर्थिक व्यवसायांचें ज्ञान मिळावें व ते व्यवसाय चालविण्यास आवश्यक असें मार्गदर्शक साहित्य त्यांस उपलब्ध व्हावें, हा संस्थापकांचा उद्देश कितपत यशस्वी झाला आहे व होत आहे, हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. "अर्थ" हें मराठी भाषेंतील एकमेव आर्थिक साप्ताहिक असून, त्याचा दर्जा अत्युच्च राखण्यांत आलेला आहे. संस्थापकांचें जानेवारी, १९४६ मध्यें निधन झाल्यानंतर, "अर्था" च्या संपादनाची सर्व जबाबदारी माझेकडे आली आणि ती पार पाडण्याचा कसोशीनें प्रयत्न मी केलेला आहे, एवढेंच येथें नमूद करूं इच्छितो. कारखाने, जॉइंट स्टॉक व सहकारी बँका, लिमिटेड कंपन्या, सहकारी सोसायट्या, व्यापारी पेढ्या, व्यक्तिगत धंदेवाले, इत्यादींस आवश्यक तें आर्थिक वाङ्मय पुरविण्याची कामगिरी अनेक तज्ञ मित्रांच्या सहाय्यानें पार पाडण्यांत आली आहे. हितसंबंधी लोकांना "अर्था"ची उपयुक्तता पटली आहे व त्यांना त्याचा उपयोग होत आहे. अत्यंत बिकट परिस्थितींत "अर्थ" चालू ठेवण्यास त्यामुळेंच उत्साह वाटतो. नव्या वर्षीहि सर्व सहकारी व सहाय्यक ह्यांच्या मदतीनें "अर्था" चें पाऊल पुढें पडत राहील, अशी खात्री आहे. १८ वर्षांच्या सेवेचें चीज होत असलेलें पाहून समाधान वाटतें आणि म्हणूनच नव्या वर्षाच्या कामास जोमानें लागण्याचा निश्चय करण्यास आनंद वाटतो.

"अर्था" च्या गेल्या १८ वर्षांतील कामगिरीचा समग्र आढावा येथें घेण्याचा उद्देश नाहीं. परंतु त्या काळांतील "अर्था" च्या धोरणाचें दिग्दर्शन करणें उचित होईल. पहिली गोष्ट म्हणजे, "अर्था" तील मजकूर निर्दोष व निरपवाद असावा, ह्याबद्दल अत्यंत दक्षता बाळगण्यांत येते. "अर्था" मध्यें प्रसिद्ध होणारी बातमी, आकडे, विधानें किंवा चर्चा हीं साधारच असणार, अशी वाचकांना खात्री वाटावी, असा संपादकांचा प्रयत्न असतो. दुसरी गोष्ट म्हणजे, "अर्था" मधील मजकुरांत कोणाचीहि किंवा कोणत्याहि जाहिरातदाराची अकारण स्तुति आढळणार नाहीं. प्रत्येक विशेषण तारतम्यानेंच वापरलें जात असल्याकारणानें, "अर्था"ची विश्वासार्हता सिद्ध झालेली आहे. कोणत्याहि दडपणाचा संपादकीय लिखाणावर आजवर परिणाम झालेला नाहीं. त्यामुळेंच जाणत्या लोकांना "अर्था" बद्दल आदर निर्माण झालेला आहे. तिसरी गोष्ट म्हणजे, "अर्था"च्या संपादकास पहिल्या दर्जाच्या तज्ञांचें लेखन-सहाय्य प्रारंभापासूनच मिळत आलेलें असल्यामुळें, स्वतंत्र बुद्धीचें आर्थिक साहित्य वाचकांस उपलब्ध होऊन वाचकांना चालू प्रश्नांवर स्वतःचें मत बनविण्यास मदत होते. आर्थिक प्रश्नांबाबत विविध माहितीचें पृष्ठ अतिशय लोकप्रिय झालें असून, त्या पृष्ठाच्या आधारावर कित्येकांना कमी श्रमांत उपयुक्त व विचारप्रवर्तक ज्ञान मिळविण्याची सोय झाली आहे.

"अर्था"नें बँकिंगविषयक प्रश्नांकडे विशेष लक्ष पुरविलेलें आहे, हें सहज लक्षांत येण्याजोगें आहे. सहकारी व जॉइंट स्टॉक बँकांच्या संचालकांना व व्यवस्थापकांना मार्गदर्शक होईल, असें कितीतरी लिखाण "अर्था" मध्यें वेळोवेळ प्रसिद्ध झालें आहे. त्याचा चांगला उपयोग होत आहे, ह्याचें गमक म्हणजे महाराष्ट्रांतील बहुतेक बँका त्यांच्या मराठी मुलुखांतील सर्व शाखांसाठीं "अर्थ" घेत आहेत हें होय. लिमिटेड कंपन्यांचे भागीदार व ठेवीदार ह्यांना कंपन्यांच्या व्यवहारांत दक्षतेनें लक्ष घालतां यावें, ह्यासाठींहि "अर्था" नें वाङ्मय पुरविलेलें आहे व सूचना केलेल्या आहेत. सहकारी संस्थांच्या विशिष्ट प्रश्नांस "अर्था" नें प्रथमपासूनच महत्त्वाचें स्थान दिलेलें आहे, आणि मराठींत सहकारी चळवळीचा एवढा पुरस्कार करणारें दुसरें कोणतेंहि वृत्तपत्र नाहीं. न्यायालयांचे, इन्कमटॅक्सचे व औद्योगिक मंडळांचे निवाडे, हें "अर्था"चें आणखी एक वैशिष्ट्य सांगतां येईल. गुळावरील इन्कमटॅक्सच्या निवाड्याविषयीं कांहीं वर्षांपूर्वीच अग्रलेख "अर्था"नें लिहून गूळवाल्यांना जागें केलें होतें, हें "अर्था"ची जुनी फाइल सिद्ध करील. बँकेंत खातें उघडतांना गिऱ्हाइकाची ओळख न मागण्याचे परिणाम "अर्था"नें स्पष्ट करून दाखविले होते, परंतु त्यासंबंधीं कांहीं ठिकाणीं हयगय झाली ती 'अर्था'च्या वाचनानें टळूं शकली असती. स्वदेशांतील आर्थिक व्यवहारांच्या माहितीबरोबर परदेशांतील तुलनात्मक माहिती देऊन "अर्था"नें वाचकांची त्यासंबंधींहि सेवा केली आहे आणि बोधप्रद तुलना करून अनुकरणीय गोष्टींचें दिग्दर्शन केलें आहे.

"अर्था" चा दिवाळी अंक हा नेहमींच माहितीपूर्ण असतो आणि त्यांत तज्ञांचे उत्कृष्ट लेख फार विस्तारपूर्वक प्रसिद्ध होत असतात. १९५२ च्या दिवाळी अंकांत "संचालकांचीं कर्जें" हा एका अनुभवी बँकरनें तळमळीनें लिहिलेला मार्गदर्शक लेख प्रसिद्ध झाला होता त्याचा बँक चालकांवर अप्रत्यक्ष परिणाम झाल्याविना राहणार नाहीं. मोठ्या आणि लहान बँका ह्यांच्या आवश्यकतेसंबंधीं आणि त्यांच्या तुलनात्मक उपयुक्ततेसंबंधीं गेले कांहीं आठवडे जी तज्ञ बँकर्समध्यें "अर्था"च्या द्वारां चर्चा झाली, तिचें महत्त्व सर्वांच्या ताज्या आठवणींतलें आहे. दुष्काळाचीं कारणें व त्यावर उपाय ह्याविषयीं तज्ञांचे लेखहि ज्ञानेच्छूंना मार्गदर्शक आहेत. केवळ उदाहरणादाखल दिवाळी अंकांतील हे कांहीं लेख घेतले आहेत; इतर लेखांसहि तेंच वर्णन लागूं पडेल.

"अर्था"च्या ह्या विविध प्रकारच्या कार्याचा गौरव लोकांनीं ह्यापूर्वीच झालेला आहे. १९ व्या वर्षांतील पदार्पणाचें निमित्त करून त्याची नव्या वाचकांस ओळख करून देण्यासाठीं येथें पुनरुच्चार केला आहे, एवढेंच.

## इं. फिनॅन्स कॉर्पोरेशननें दिलेलीं कर्जे

पार्लमेंटांत इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन (अमेंडमेंट) बिलावर चर्चा चालू असतांना, कित्येक सभासदांनीं कॉर्पोरेशनच्या कर्जेविषयक कारभारावर कडक टीका केली आणि कॉर्पोरेशननें ज्यांना कर्जे मंजूर केलीं, अशा कंपन्यांच्या नांवांची मागणी केली. कर्जे देणाऱ्या संस्थेनें तिच्या कर्जदारांबद्दल व कर्जाबद्दल गुप्तता राखणें हें योग्यच असतें. परंतु अशा संस्थेबद्दल लोकांच्या मनांत किलमिश निर्माण झालें तर तें दूर करणेंहि योग्यच ठरेल. इं. फि. कॉर्पोरेशन व तिचे कर्जदार ह्यांचेबद्दल किंतु राहूं नये, ह्या दृष्टीनें कॉर्पोरेशननेंच पंतप्रधान श्री. नेहरू ह्यांस लिहून कळविलें, कीं तिची पार्लमेंटास कर्जदारांची यादी व कर्जाची रक्कम पुरविण्याची इच्छा आहे त्याप्रमाणें पार्लमेंटास हा तपशील देण्यांत आला.

पार्लमेंटांतील चर्चेचे प्रसंगीं कर्जे देतांना वशिलेबाजी होते, असा कार्पोरेशनवर आरोप करण्यांत आला. त्याची चौकशी करून कॉर्पोरेशनकडे दोष नसल्यास तसें स्पष्ट करणें अगत्याचें झालें. कॉर्पोरेशनचे चेअरमन श्री. श्री राम व इतर संचालक ह्यांनीं तर ह्या आरोपांची छाननी करण्यासाठी कमिटीच्या नेमणुकीची मागणी केली. अशा कमिटीची नेमणूक केली जाईल आणि त्यांत दोन्ही सभागृहांचे प्रतिनिधी व बाहेरचे एक-दोन तज्ज्ञ असतील असें अर्थमंत्री श्री. देशमुख ह्यांनीं पार्लमेंटांत जाहीर केलें.

कॉर्पोरेशनच्या कारभारावरील टीकेमुळें, कॉर्पोरेशच्या कर्जाचा तपशील आतां उपलब्ध झाला आहे. त्यांत एकूण १४,०३,४५,००० रु. कर्जाचे उद्योगधंदेवार आणि कंपनीवार आकडे देण्यांत आले आहेत. त्यावरून महाराष्ट्रीय कंपन्यांना तरी वाशिलेबाजी बाधक झालेली नाहीं, असें दिसून येईल. किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लि. ला २०,००,००० रुपये मिळाले असून म्हैसूर किर्लोस्कर लि. ला ३,००,००० रु. मिळाले आहेत. लोकमान्य मिल्स बार्शी लि. आणि पुलगांव कॉटन मिल्स लि. ह्यांना अनुक्रमें ८,००,००० रु. व १३,७५,००० रु. कर्ज मिळालें आहे. ओगले ग्लास वर्क्स लि. २०,००,००० रु., त्रावणकोर ओगले ग्लास मॅ. कं. लि. ५,००,००० रु., म्हैसूर ग्लास अँड एनॅमल वर्क्स लि. ४,००,००० रु. असे ओगल्यांच्या सिरॅमिक्स व ग्लास कंपन्यांचे आकडे आहेत. कर्जदार साखर-कारखाने तीन असून त्यांचा तपशील बागाइतदार को. शुगर प्रोड्यूसर्स सोसायटी लि. ३०,००,००० रु., सासवड माळी शुगर फॅक्टरी लि. २०,००,००० रु. आणि डेक्कन शुगर अँड अबकारी कं. लि. ३५,००,००० रु. असा आहे. कागद कारखानदारांपैकीं हँडमेड पेपर लि. ३,००,००० रु. आणि पेपर अँड पल्प कन्व्हर्शन्स लि. १२,००,००० रु. असे कर्जदार व कर्जे आहेत. प्रीमिअर ऑटोमोबाइल्स लि. ला ५०,००,००० रु. कर्ज मिळालें असून स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लि. ला १२,००,००० रु. कर्ज मिळालें आहे.

मोठ्या कर्जांत मशिनरी मॅन्युफॅक्चरर्स कॉर्पोरेशन लि. (४३,००,००० रु. कर्ज), ओरिसा टेक्स्टाइल मिल्स लि. (५०,००,००० रु. कर्ज), मोदी स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल्स कं. लि. (३०,००,००० रु. कर्ज), श्री दिग्विजय वुलन मिल्स लि. (३५,००,००० रु. कर्ज), नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशन लि. (५०,००,००० रु. कर्ज), मेटुर केमिकल अँड इंडस्ट्रिअल कॉर्पोरेशन लि. (३०,००,००० रु. कर्ज), ध्रांगध्रा केमिकल वर्क्स लि. (६५,००,००० रु. कर्ज), फर्टिलायझर्स अँड केमिकल्स [त्रावणकोर] लि. (५०,००,००० रु. कर्ज), श्री दिग्विजय सिमेंट कं. लि. (५०,००,००० रु. कर्ज) ॲल्युमिनिअम कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. (५०,००,००० रु. कर्ज) निजाम शुगर फॅक्टरी लि. (४०,००,००० रु. कर्ज) आणि म्हैसूर पेपर मिल्स लि. (५०,००,००० रु. कर्ज) असे प्रमुख आकडे आहेत.

---

## पंचवार्षिक योजनेस परकीयांचें सहाय्य

### चीनला वरचढ होऊं न देण्याचा उद्देश

"भारतापुढें अनेक प्रश्न उभे आहेत, त्यांतील आर्थिक प्रश्न सर्वांत तातडीचा आहे. आजच्या उत्पन्नाच्या अंदाजाप्रमाणें पंचवार्षिक योजनेंतील १,५०,००,००,००० पौंड खर्चापैकीं १,०३,४२,५०,००० पौंड खर्च उत्पन्नांतून आणि बचतींतून भागवितां येईल—त्यांत ९,७५,००,००० पौंडांची आधींच झालेली परदेशी मदत समाविष्ट आहे. स्टर्लिंग बॅलेन्सेसमधून आणखी २१,७५,००,००० पौंड मिळूं शकतील आणि २४,७५,००,००० पौंडांची तरतूद करावयाची रहाते. परदेशी मदतीवर ती अवलंबून आहे, असें भारत सरकारनें स्पष्टपणें कबूल केलें आहे. भारत हा पैसे गुंतविण्याच्या दृष्टीनें श्रेयस्कर कर्जदार आहे किंवा नाहीं हें जगांतील स्वातंत्र्यप्रेमी राष्ट्रांनीं सर्व दृष्टींनीं विचार करून ठरविलें पाहिजे, आणि त्यावर जगाचें भवितव्य अवलंबून राहील. आर्थिक अभ्युदयाचे प्रयोग करण्यास जगांतील दोन दाट वस्तीचे व जुन्या संस्कृतीचे आशियांतील देश तत्पर झाले आहेत. कम्युनिझमच्या धोरणानें आणि निष्ठुर पद्धतीनें चीनचें परिवर्तन होणार असून चिनी लोकांना आर्थिक प्रगतीकडे अक्षरशः जुंपून हाकत नेलें जाईल. भारतानें लोकशाहीचा अवलंब करून नेत्रदीपक प्रगतीचीं साधनें त्याज्य ठरविलीं आहेत. चीनबरोबर भारताची आर्थिक बळाची स्पर्धा सुरू झाली आहे, तींत भारतास दारिद्र्यांत राहून एकाएकी प्रयत्नांनीं यश मिळवितां येणें अशक्य आहे. परंतु, चीनजवळ जें सामर्थ्य-साधन नाहीं, तें भारतास मिळवितां येण्याजोगें आहे. तें म्हणजे भांडवल निर्गत करतां येण्याजोग्या सामर्थ्याच्या अधिक श्रीमंत राष्ट्रांची मैत्री व सहकार्य. लोकशाही समाजरचना टिकविण्याच्या भारताच्या निर्धाराबद्दल आणि सामर्थ्याबद्दल भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या यशस्वी कामगिरीमुळें शंका उरलेली नाहीं. सामाजिक स्वातंत्र्याच्या ह्या महान प्रयत्नांपासून पाश्चिमात्य राष्ट्रांनीं दूर राहून चालणार नाहीं. आज कम्युनिझम-बरोबर प्रत्यक्ष युद्ध नसलें, तर कम्युनिस्टांनीं भारताची सरहद्द गांठली आहे. भारताला चीनशीं होणाऱ्या स्पर्धेत टिकाव धरण्यास पुरेल, एवढी तरी मदत ब्रिटिश कॉमनवेल्थनें किंवा युनायटेड स्टेट्सनें भारताला दिली नाहीं, तर तें मूर्खपणाचें ठरेल."—एकॉनॉमिस्ट.

---

**प्राथमिक शिक्षणावरील खर्च**—अहमदाबाद म्युनिसिपल स्कूलबोर्ड प्राथमिक शिक्षणावर ३० लाख रुपये खर्च करणार आहे. बोर्डाच्या अधिकारक्षेत्रांत ७०,००० प्राथमिक विद्यार्थी असून ६०० पेक्षा अधिक शिक्षक अध्यापनाचें काम करीत असतात.

**ओखा बंदराची सुधारणा**—ओखा बंदराची सुधारणा करण्यासाठी भारतीय सरकारनें मुंबई सरकारला २७ लाख रुपयांचें कर्ज देण्याचें ठरविलें आहे. कर्ज ३० वर्षांत परत करावयाचें असून त्यावर पहिल्या १० वर्षांत व्याज घेण्यांत येणार नाहीं.

# दुष्काळ-निवारणाचे योग्य उपाय

**( मुख्यतः महाराष्ट्र-कर्नाटकाकरितां )**

( " अर्था " च्या पृष्ठ ४३० वरून पुढें )

## भूदान-यज्ञानें दुष्काळाचा प्रश्न सुटेल का ?

( लेखक:—न. स. जोशी, रि. सुपरिंटेंडिंग इंजिनिअर )

" भूदान-यज्ञ " याचा शेवटीं काय अर्थ ठरेल यावर या प्रश्नाचें उत्तर अवलंबून राहील. सध्यां एखाद्या राजकीय वा सामाजिक पक्षाचा नेता वा सदस्य तो पक्ष व ती संस्था सोडल्याचें सांगतो व पुन्हां कांहीं महिन्यांनीं त्यांत पुन्हां शिरतो, तद्वतच शब्दांचे अर्थ व संस्थांचे उद्देश सारखे बदलत असतात. त्यामुळें " भूदान-यज्ञ " शब्दाचा शेवटीं अर्थ काय ठरेल किंवा तो यज्ञ प्रत्यक्ष व्यवहारांत कसा येईल, यावर त्याची फलश्रुति व एखाद्या उद्देशाचे दृष्टीनें योग्यायोग्यता अवलंबून राहील.

कांहीं झालें तरी, प्रांतांतील इतर जनतेच्या नांवावर काढलेल्या भांडवलावर दुष्काळी भागांत कालवे काढण्यापेक्षा, भूदान-यज्ञ दुष्काळनिवारणास खासच अधिक उपयोगी; पण याचा अर्थ तोच एकमेव एक उपाय किंवा तोच सर्वांत उत्तम उपाय असा मात्र नव्हे.

भूदान-यज्ञाचे जे निरनिराळे अर्थ वा टप्पे संभवतात त्यांचा उपयोग कितपत होईल वगैरे माहिती खालील तालिकेंत दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

| क्र. | वर्णन | व्याप्ति | उपयुक्तता मुख्यतः " दुष्काळ " निवारणाच्या दृष्टीनें | |
|---|---|---|---|---|
| | | | पुढील ५-१० वर्षांत | भविष्यकाळीं (१०-१५ वर्षांनंतर) |
| १ | सध्यांच्या जमीन मालकांनीं आपखुशीनें आपल्या मालकीची कांहीं जादा जमीन इतरांना वाटण्याकरितां देणें. | हें कांहीं गांवांत साध्य होईल व कांहींत होणार नाहीं. कांहीं गांवांत भरपूर तर कांहीं गांवांत नांवाला | ज्या गांवांत बिगर-जमीन कुटुंब शिल्लक राहणार नाहीं तेथें चांगलाच उपयोग होईल; तरीही तेथें सुद्धां दुष्काळी सालांत अडचण भासणारच. | १०-१५ वर्षांत उपयुक्तता बरीच घटेल. कारण नवीं बिगरजमीन कुटुंबें अस्तित्वांत येतील; म्हणून भविष्यकाळीं निरुपयोगी. |
| २ | वरील प्रमाणेंच पण सरकारी कायद्यानें.मोठ्या जमीनदारांकडून कांहीं जमीन विकत घेऊन ती बिगरजमीन कुटुंबांस योग्य अटींवर देणें. | सरकारी कायदा असल्यामुळें राज्यांतील सर्व गांवांस लागू. | सर्व प्रांतांत उपयोगी पडेल. जवळजवळ एक पिढीपर्यंत दुष्काळ-निवारणास फारच उपयुक्त. तरीहि अवर्षणाच्या सालीं अडचण भासेल. मात्र क्र. १ पेक्षां पुष्कळच कमी. | २५-३० वर्षेपर्यंत उपयुक्त. त्यांनंतर लोकसंख्येंत मोठी वाढ होऊन पुन्हां निरुपयोगी होईल. |
| ३ | Common Wealth (समाईक संपत्ति) ह्या शब्दाच्या खऱ्या अर्थानें खेडेगांवांतील सर्व जमीन तेथील सर्व लोकांनीं कसून त्यांतील उत्पन्न समाईक मालकीचें, अशा अर्थानें. | प्रस्तुतचे कायदे व व्यवहार यांत क्रांतिकारक फरक. त्यामुळें आजच्या घटकेला निव्वळ काल्पनिक. | ३-४ पिढ्यांस उपयोगी. अवर्षण सालाकरितां साठ्याची (storage) ची व्यवस्था केल्यास दुष्काळ निवारण उत्तम तऱ्हेनें होईल. | ६० ते १०० वर्षांनंतर लोकसंख्या दुप्पट होऊन सर्व जनतेसच दुष्काळ जाणवूं लागेल. मात्र सर्वांस सारखा अर्थात् जी राजसंस्था स्तंभ दोन व तीन मध्यें वर्णन केलेली व्यवस्था अंमलांत आणूं शकेल, ती लोकसंख्येच्या वाढीसहि आळा घालूं शकेल असें मानण्यास हरकत नाहीं. |

दुष्काळनिवारणाच्या दृष्टीनें धरण-कालवे योजना पेक्षा भू वितरण ( भूदानाच्या क्र. २ च्या प्रकारास भूवितरण शब्द वापरावा ) योजना श्रेष्ठ म्हणून वर सांगितलें, तें पडताळून घेण्यास अधोनिर्दिष्ट आंकडे उपयोगी पडतील. आंकडे ठोकळ आहेत, पण असल्या तुलनेस ठोकळ आंकडेच जास्त उपयोगी. त्यांत वरील तालिकेंतील क्रमांक (२) चाच विचार केला आहे. कारण क्र. १ वा ३ मध्यें जमीन विकत घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं.

| | | सर्व राज्यांतील | फक्त दुष्काळी प्रदेशांतील |
|---|---|---|---|
| (१) मुंबई राज्यांतील बिगर जमीन खेडूत लोकसंख्या. | | ८० लक्ष | ४० लक्ष |
| (२) बिगर जमीन कुटुंबें (कुटुंबांत ५ व्यक्ति धरून) | | १६ लक्ष | ८ लक्ष |
| (३) दर कुटुंबास दुष्काळी भागांत ३ एकर प्रमाणें दिल्यास लागणारी जमीन | | | २४ लक्ष एकर |
| (४) दुष्काळी भागांतील दर एकरास १५० रु. प्रमाणें जमीन विकत घेतल्यास किंमत. | | | ३६ कोटी रुपये |
| (५) वरील द्रव्यांत होतील इतके व निरा-प्रवरा वगैरे प्रकारची प्रकल्प-योजना केल्यास वार्षिक किती एकर क्षेत्र भिजेल ? | | | ३½ लक्ष एकर |
| (६) वरील क्षेत्रावर किती बिगर-जमीन व्यक्तींना काम मिळेल ? (हे आकडे " गोखले इन्स्टिट्यूट "च्या १७ व्या प्रकाशनांतील माहितीनुसार पण थोडे वाढवूनच धरले आहेत.) | फक्त शेत-मालकांचे कुटुंबातील इसमांना | | ६०,००० |
| | इतर बिगरशेती इसमांना | | ५०,००० |
| | तात्पुरते | | ४०,००० |
| | एकूण | | १,५०,००० |
| वरील कामकऱ्यांच्यावर अवलंबून रहाणाऱ्या कुटुंबांतील एकंदर संख्या. | मजुरीवर लावलेलीं व घरांतील माणसें (family labour) अशी दोन्ही धरून. | | ३ ते ४ लक्ष. |
| | फक्त मजुरीवर लावलेले. (घरांतील माणसें यांत धरलीं नाहींत) | | २ ते ३ लक्ष. |

वर जो " फक्त मजुरीवर लावलेल्या जनसंख्येचा आंकडा दिला आहे त्यांत वर्षांतील बरेच दिवस काम मिळणारे व फक्त जुजबी काम मिळणारे अशा दोहोंचीहि संख्या आली. अर्थात् ज्यांना फक्त जुजबी काम मिळूं शकतें अशांचें दुष्काळापासून संरक्षण होतें असें मानणें बरोबर नव्हे.

सारांश, भू-वितरण प्रकारानें जेवढ्या द्रव्यांत ४० लक्ष बिगर जमीन खेडुतांचा प्रश्न सुटेल त्याच द्रव्यांत पाट-बंधारे बांधल्यास फार तर ४ लक्षांची सोय होईल. वरील आंकडे देण्यांतला मुख्य उद्देश हा कीं, ३६ कोटी रुपये क्षेत्र-पायनिक प्रकल्पांवर खर्चून फार झालें तर ३०० गांवांच्या दुष्काळ-निवारणाची सोय होईल. मात्र भू-वितरणयोजनेनें तेवढ्याच खर्चात सुमारें ५,००० गांवांची सोय होईल. पायनिक आकल्पांत वार्षिक तोटा सोसावा लागतो व त्यावरील घसाऱ्याचा भार राज्याच्या तिजोरीवर पडतो असा आजवरचा अनुभव आहे. तसा भार या भू-वितरण-योजनेंत, पडणार नाहीं. कारण एकतर जमिनीला झीज वे घसारा नाहीं.

शिवाय मूळ रकमेवरील व्याजाइतका वसूल जमीन ज्याला द्यावयाची त्याचेकडून करतां येईल. आपणांपुढील प्रश्न असा कीं:—(१) ३६ कोटी रुपयांत ५,००० पैकीं ३०० (फार तर ५००) गांवांची उत्तम व्यवस्था लावून बाकीच्या ४,५०० खेड्यांतील दुष्काळपिडितांना पूर्वीप्रमाणेंच राहूं द्यायचे ? कीं (२) ५,००० गांवांतील बिगरशेती व्यक्तींच्या कुटुंबांची धान्यापुरती तरी विवंचना दूर करावयाची ? याचें उत्तर उघड आहे. ५,००० खेड्यांतील बिगर-जमीन दुष्काळपिडितांची विवंचना दूर करणेंच आपलें प्रथम कर्तव्य. अर्थात् भू-वितरणापेक्षांहि मितव्ययी कोणती योजना असली तर ती पाहिजेच आहे.

या विवेचनावरून खात्री पटेल कीं, भूदान-यज्ञांतील पहिला टप्पा सुद्धां कालव्यांचे मानानें सर्व दृष्टींनीं श्रेष्ठ. त्यांतील मुख्य उद्देशच असा कीं, ज्या ज्या खेड्यानें आपापल्या गांवांतील भुकेल्यांची सोय, त्यांना जमीन देऊन करायची. त्याचा भार राज्यांतील इतर भागांवर द्रव्यरूपानें वा इतर रूपानें शक्य तोंवर पाडावयाचा नाहीं. भू-वितरण हा दुसरा टप्पा त्याहूनहि चांगला. मात्र त्या प्रकारांत राज्य-सरकाराला ३०-४० कोटी रुपये खर्च येणार: अर्थात् कालव्यांना लागला असता, त्यामानानें अत्यल्प. शिवाय सर्व दुष्काळी भाग कांहीं कालव्यांच्या वशागत येऊं शकणारा नाहीं. शेकडा ८० टक्के क्षेत्रावर कालवे होऊंच नाहींत, ही अडचण भूदान वा भूवितरण प्रकारांत नाहीं. तसेंच "कालवे केले गरिबांकरतां व त्यावर पैसे उकळले श्रीमंतांनीं" असला अंधार-नगरीला साजेसा प्रकार तरी त्यांत नाहीं.

येथें हें नमूद करणें जरूर आहे कीं, भूदान-यज्ञाची कल्पना व पोषण-क्षम क्षेत्रा (Economic Holding) ची मूलभूत कल्पना एकमेकांशीं विसंगतच नव्हे तर विरोधी आहेत. पोषण-क्षमक्षेत्र (Economic Holding) पाहिजे म्हटल्यास सर्वांना पुरेल इतकी जमीनच नाहीं. शिवाय पोषण-क्षमक्षेत्राची मूलभूत कल्पनाच शेतकरी-कुटुंबाचीच फक्त काळजी घ्यावयाची असा आहे. त्यांच्या आर्थिकयास (Economics) जुळण्याकरितां, बिगर-शेती मजूर जरूर तेव्हां (काढणी-पेरणीच्या वेळेपुरते) मिळावे ही त्यांतील मूलभूत अपेक्षा. त्या बिगर-शेती मजुरांनीं काढणी-पेरणीचा हंगाम सोडून इतर दिवसांत कसें जगावें ह्याचा विचार त्यांत नाहीं. आपल्यापुढील प्रश्न मात्र मुख्यतः ह्या बिगर-शेती व्यक्तींस निदान दुष्काळांत कसें वांचवावें हा आहे. भूवितरणाच्या पहिल्या किंवा दुसऱ्या टप्प्यांतील मुख्य गुण म्हणजे 'धान्यवाटपांतील विषमता थोडी कमी करण्याचा तो एक मार्ग आहे हा होय.' संभव असा कीं, धान्यवाढ तर राहोच पण भूदानानें वा भूवितरणानें जमिनींचे लहान लहान तुकडे झाल्यामुळें धान्योत्पादन थोडें कमी होण्याचाच संभव ! मात्र सध्यांच्या स्थितींत बिगर-जमीन कामकरी इसमास रोजीं कधीं-कधीं ६ औंस सुद्धां मिळत नाहींत व त्या उलट ज्यांना शारीरिक श्रम करावे लागत नाहींत अशा बड्या जमीनदारांस व कुटुंबीय व्यक्तींस रोजीं शेर सव्वाशेर अशा प्रकारच्या धान्याच्या विषम व अयोग्य वाटणींत त्यायोगें सुधारणा होईल, हें निश्चित.

---

**दांताचें कलम यशस्वी**—ऑस्ट्रिअन दंतवैद्यांच्या संघासमोर दांताचें कलम करण्याचा प्रयोग नुकताच यशस्वीपणें करण्यांत आला. डॉ. केरेझटेसी नांवाच्या डॉक्टरनीं १० वर्षांच्या एका मुलाचा दात हिरडींत पू झाल्यामुळें काढून ठेवला होता. तो त्यांनीं त्याच दाताच्या जागीं एका स्त्रीच्या कवटींत बसविला आणि तो नैसर्गिक दातासारखा वाढला.


१९५० अखेरचें ११ वें यशस्वी मूल्यमापन

१९५० मध्येंही रु. २६५ लाखांवर नवीन विम्याचें पूर्ण काम.

वेस्टर्न इंडिया

विमा कंपनीनें

आपलें सामर्थ्य, स्थैर्य व सेवा

यासंबंधींची प्रचिती पुन्हां एकवार विमा जगतास आणून दिली आहे.

दर हजारी त्रैवार्षिक बोनस

| हयातींतील पॉलिसी | हयातीनंतरची पॉलिसी |
|---|---|
| रु. २७ | रु. ३३ |

कंपनीच्या वाढत्या वैभवांत सहभागी व्हा व सर्वोत्कृष्ट फायद्यासाठीं

वेस्टर्न इंडियाची निवड करा.

के. वाय. जोशी, बी. ए., एफ. आय. ए.

मॅनेजर

वेस्टर्न इंडिया लाईफ

इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा.

शाखा कचेरीः— शहर: १७९ बुधवार पेठ, लक्ष्मीरोड, पुणें. कँप: केअर-ऑफ क्रेसवेल्स ईस्ट स्ट्रीट, पुणें-१

फोन नंबर— ३४०२



दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) | श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०

विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०

वसूल भांडवल रु. ४,००,०००

एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. वा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

### भारतीय बंदरांची सुधारणा

भारताच्या बंदरांतून सांठलेली वाळू उपसून काढण्यासाठीं संयुक्त राष्ट्रसंघानें आपले तज्ज्ञ देऊं केले आहेत, असें समजतें. सर्व बंदरांची पहाणी करून वाळू काढण्याचा एक कार्यक्रम आखणें जरूर झालें आहे. हें कार्य करण्यासाठीं कोणत्या प्रकारचे ड्रेजर्स लागतील त्याचाहि निर्णय करावा लागेल. ह्या व इतर संबंधित विषयांचा विचार करण्यासाठीं नॅशनल हार्बर बोर्डाची तिसरी वार्षिक बैठक ता. २४ डिसेंबर रोजीं दिल्ली येथें भरली होती. बैठकींत दुय्यम प्रतीच्या १८ बंदरांची तावडतोब सुधारणा करण्याचा विचार झाला असें समजतें. अशीं ७ बंदरें मद्रास राज्यांत आहेत, १ त्रावणकोर कोचीनमध्यें, ५ सौराष्ट्रांत आणि ४ मुंबई राज्यांत आहेत. ह्या सर्व बंदरांचा विकास करण्यासाठीं लागणाऱ्या द्रव्याचीहि चर्चा बैठकींत झाली. बंदरांचा विकास घडवून आणण्यासाठी प्रथम एक आर्थिक योजना आखण्यांत आली होती. बंदरांमधून होणाऱ्या आयात व निर्यात मालाच्या प्रत्येक टन वजनावर जास्तींत जास्त ४ आणे फी वसूल करण्यांत यावी आणि ह्या उत्पन्नामधून एक विकास फंड उभारण्यांत यावा अशी ही योजना होती. ह्या फंडाला मध्यवर्ती सरकार व राज्य सरकारें ह्यांनींहि साह्य करावयाचें होतें. प्रत्येक विकास योजनेवर होणाऱ्या खर्चापैकी ५० टक्के रक्कम राज्य सरकारनें, २५ टक्के मध्यवर्ती सरकारनें आणि उरलेली रक्कम वरील फंडामधून घ्यावयाची होती. पण भारतीय सरकारनें ही योजना मान्य केली नाहीं. नवीन योजनेप्रमाणें मध्यवर्ती सरकार अशी उचलून मदत करणार नाहीं. प्रमुख बंदरें आपल्या आयात–निर्यातीवरील लेव्हीच्या रूपानें जितकी रक्कम उभारतील तेवढ्या रकमेचें कर्ज भारतीय सरकार देईल. जें–तें प्रमुख बंदर आपआपली वसूल रक्कम स्वतःच्या विकासासाठी वापरूं शकेल. दुय्यम बंदरांतून जी आयात–निर्यात होते, त्यावरील उत्पन्नांतून राज्यसरकारें त्या बंदरांचा विकास करतील आणि स्वतःहि कांहीं रक्कम खर्च करतील. सर्व प्रमुख बंदरांना मिळून मध्यवर्ती सरकार ८ कोटी रुपये कर्ज देणार होतें, त्याऐवजीं आतां १२ कोटी रुपये देणार आहे. कांहीं बंदरांमधून तेल गाळण्याचे कारखाने उभारण्यांत यावयाचे आहेत. कारखान्यांच्या खास सोईसाठीं म्हणून ८ कोटी रुपये वेगळेच खर्च करण्यांत यावयाचे आहेत.

---

### औद्योगिक प्रगतीची तपासणी करण्यासाठीं सर जॉर्ज शूस्टर

भारताच्या औद्योगिक प्रगतीची पहाणी करण्यासाठीं सर जॉर्ज शूस्टर हे 'फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री'च्या निमंत्रणावरून भारतांत १७ डिसेंबर रोजीं आले असून ते सहा आठवडे येथें रहाणार आहेत. पंचवार्षिक योजनेंतील धोरणें लक्षांत घेऊन, विशेषत: बिनसरकारी प्रयत्नांनीं जलद परंतु कायम स्वरूपाची औद्योगिक प्रगति कशी घडवून आणतां येईल, तें सांगण्याची कामगिरी सर जॉर्ज शूस्टर ह्यांचेवर सोंपविण्यांत आली आहे. १९२८ ते १९३४, ते व्हाइसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सभासद होते. १९३८ ते १९४५, ते ब्रिटिश पार्लमेंटचे सभासद होते. आर्थिक व औद्योगिक पहाणीची जबाबदारीचीं कामें ग्रेट ब्रिटनमध्यें त्यांनीं केलेलीं आहेत. कित्येक बँकांचे व कंपन्यांचे ते डायरेक्टर आहेत.

---

### सहकारी चळवळीचें प्रातिनिधिक मत

ऑल इंडिया को. युनियनची सभा दिल्ली येथें श्री. आर. जी. सरय्या ह्यांच्या अध्यक्षतेखालीं नुकतीच भरली होती. मध्यवर्ती सरकार आणि प्लॅनिंग कमिशन ह्यांचा दुवा जोडण्याचें अगत्य सभेनें प्रतिपादन केलें. मध्यवर्ती सरकारचें अन्न–शेतीखातें आणि को. युनिअनची एक्झिक्युटिव्ह कमिटी ह्यांचा संबंध रहावा ह्यासाठीं सभेनें कांहीं सूचना केल्या. एकमेकांस एकमेकांचा सल्ला मिळावा आणि मध्यवर्ती सरकारची सहकारी योजनांना मिळावयाची मदत योग्य मार्गानें दिली जावी, हा त्यांत हेतु होता. भारतांतील सहकारी कार्यकर्त्यांचें प्रातिनिधिक मत युनियन व्यक्त करीत असल्यानें तिचा सल्ला प्रातिनिधिक समजला जावा, असेंहि सांगण्यांत आलें.

---

### शेतकी कर्जपुरवठ्याच्या प्रश्नांचा विचार

रिझर्व्ह बँकेनें नियुक्त केलेल्या, ॲग्रिकल्चरल क्रेडिटच्या स्टँडिंग ॲडव्हायसरी कमिटीची सभा नुकतीच झाली. नव्या मध्यवर्ती बँकांची स्थापना, चालू बँकांची पुनर्घटना, सहकारी बँकांनीं राखावयाच्या तरल्या पैशाबाबत ( फ्लुइड रिसोर्सेस ) एकजात नियम, ऑडिटरच्या वर्गवारीची प्रमाणबद्धता, इत्यादिबाबत कमिटीनें पूर्वी शिफारसी केल्या होत्या, त्यांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यांत आला. पुणें येथील को. ट्रेनिंग कॉलेजांत रिझर्व्ह बँकेनें सुरू केलेले सहकारी शिक्षणाचे वर्ग, राज्य सहकारी बँकांना कर्जे द्यावयाची रिझर्व्ह बँकेची पद्धति, रिझर्व्ह बँकेकरवीं सहकारी बँकांची तपासणी, शेतीच्या कर्जपुरवठ्याबाबत प्लॅनिंग कमिशनच्या सूचना, इत्यादींचाहि कमिटीनें विचार केला.

---

### कुटुंबाच्या मिळकतींत पत्नीला वांटा

ब्रिटनमध्यें घटस्फोटांची संख्या वाढूं लागल्यामुळें चिंतेचें वातावरण निर्माण झालें आहे. घटस्फोटामुळें मुलांच्या जीवितावर अनिष्ट परिणाम होतो. वैवाहिक जीवन अधिक स्थिर करण्यासाठीं काय करावें ह्याची चौकशी करण्यासाठीं ब्रिटिश सरकारनें एक रॉयल कमिशन नेमलें होतें. कमिशनपुढें साक्ष देतांना मिसेस नॉरमॅन्टन ह्या बाई म्हणाल्या, "आर्थिक दृष्ट्या अधिक न्यायाची वागणूक झाली पाहिजे. सध्या ज्या मुलांची सोय सरकार करीत आहे त्यांना सुद्धां दर आठवड्याला कांहीं थोडी रक्कम हातखर्चाला मिळते. पण अजूनसुद्धां कुटुंबांतील गृहिणीला आपल्या स्वतंत्र मिळकतींतील थोडीशी रक्कमहि बाजूला काढून ठेवतां येत नाहीं, हें घातुक आहे. पतीनें कुटुंबप्रमुख म्हणून नांदण्यास हरकत नाहीं. पण कुटुंबाच्या मिळकतीपैकी योग्य वांटा पत्नीला मिळालाच पाहिजे. त्यांनीं दोघांनीं मिळून उत्पन्नावर नियंत्रण ठेवावें. ब्रिटनमधील ८० टक्के विवाहित स्त्रिया घराबाहेर कामाला जात नाहींत. ज्या २० टक्के जातात त्यांना घरांतून हातखर्चाला पैसे मिळत नाहींत, म्हणून जातात." मिसेस नॉरमॅन्टन ह्या कौन्सिल ऑफ मॅरीड वुइमेन्स ह्या संस्थेच्या संस्थापक आहेत.

---

**पूर्व–पाकिस्तानांत फिल्म–स्टुडिओ**—लाहोर येथील फिल्म स्टुडिओज आणि ईस्ट–पाकिस्तान मोशन पिक्चर्स असोसिएशन ह्यांच्या दरम्यान वाटाघाटी होऊन पूर्व पाकिस्तानांत लवकरच फिल्म स्टुडिओ काढण्याचें ठरलें आहे. बोलपटांचें चित्रीकरण पूर्व–पाकिस्तानांत करण्यांत येऊन पुढील संस्करण लाहोरमध्यें करण्यांत येणार आहे.

### ग्रामपंचायत, बावची (द. सातारा)

(-लि. आ. म.)

बावची ग्रामपंचायतीचा वार्षिक अहवाल पाहतां, चालूं वर्षी सर्वांगीण अशी सुधारणा केल्याचें दिसतें. त्यामध्यें गांवकऱ्यांचे मदतीनें, आष्टे-शिराळा रस्ता हा तयार होत आलेला दिसतो. तसेंच पंचायतीनें आरोग्याचे बाबतींतहि आघाडी मारलेली असून लवकरच दवाखाना सुरू करणार असल्यानें नजिकच्या आठ-दहा खेड्यांना फायदा होणार आहे. शाळेची इमारत बांधण्याकरितां मिळालेली आश्वासनाची रक्कम गोळा करीत असलेचेंही दिसतें. दिवाबत्ती, वाचनालय, खताचे खड्डे व रस्ते दुरुस्तीचीं कामें हातावेगळीं केलीं आहेत. वृक्षारोपण करून जुन्या वृक्षांचें जोपासनेकडेहि विशेष लक्ष घातलें आहे. बावची ग्रामपंचायत ही प्रथमपासून "अ" वर्गात असून, संबंधी अधिकारी, प्रांतसाहेब, प्रेसिडेंट वगैरेंनीं भेटी देऊन उत्तम शेरे दिलेले आहेत. शेतसारा शेंकडा पंधरा टक्के, तसेच घरपट्टी, चहाचीं दुकानें, विवाह व जेवणावळीवरील कर अहवालाचे सालीं रुपये ३,५५९ जमा असून थकबाकी अवघी शंभराचे आसपास आहे. उत्साही सेक्रेटरी हे सुरुवातीपासून असल्यानें कामाचा उठाव बराच झाल्याचें दिसतें. सरपंच श्री. वि. म. यादव यांचें काटकसरीकडे विशेष लक्ष आहे. हें त्यांना व बावची ग्रामस्थांना भूषण आहे.

---

### अंदमानमध्यें नारळाची लागवड

अंदमान बेटांत नारळाची लागवड मोठ्या प्रमाणावर करण्याचे प्रयत्न सेंट्रल कोकोनट कमिटीतर्फे करण्यांत येणार आहेत. हें काम करण्यासाठी कमिटी तज्ज्ञांची एक तुकडी आणि एक संशोधक चालू वर्ष संपण्यापूर्वी ह्या बेटांत पाठविणार आहे. ह्या योजनेसंबंधींची प्राथमिक पहाणी पुरी झाली असून तींत नारळाची लागवड करण्याची शक्यता अजमावण्यांत आली आहे. बेटांत जाऊन रहाणाऱ्या तज्ज्ञांची तुकडी नारळाचीं नमुनेदार बनें तयार करणार आहे, तेथील रहिवाशांना नारळाचे सुधारलेले बियाणें पुरविणार आहे आणि आधुनिक पद्धतीच्या लागवडीचे शिक्षणहि देणार आहे. अंदमान बेटांत नारळाच्या लागवडीला अनुकूल अशी विस्तीर्ण जमीन आहे आणि शक्य तितक्या लवकर ती लागवडीखालीं आणण्याचा सरकारचा मनोदय आहे. ह्या योजनेचा खर्च भारतीय सरकार आणि कमिटी निम्मेनिम वांटून घेणार आहे. आसाम व बंगाल राज्यांतहि अशा प्रकारच्या योजना अंमलांत आणण्याचा सरकारचा विचार आहे. अगदी अलीकडच्या आंकड्यांप्रमाणें भारतांत सुमारे १४,७२,००० एकर जमीन नारळाच्या लागवडीखालीं आहे. दरवर्षी अंदाजें ३,१७,३०,९४,००० नारळ निर्माण करण्यांत येतात. सध्या नारळाची लागवड मुख्यतः मद्रास व त्रावणकोर-कोचीन ह्या राज्यांतून होते. ह्या दोन राज्यांतील लागवडीचें क्षेत्र अनुक्रमें ६३,३३,००० एकर आणि ६,०६,००० एकर इतकें आहे. आसाम, बंगाल, ओरिसा, म्हैसूर आणि कूर्ग ह्या भागांतूनहि नारळाची लागवड होते. महाराष्ट्रांत कोंकणांतील नारळाची लागवड प्रसिद्धच आहे. पण कोंकणांतील समुद्रकांठच्या लागवडीची योग्य निगा राखली जात नाहीं असें समजतें. समुद्राच्या लाटांनीं माती धुवून जाते व नारळी उघड्या पडतात.

### नगर जिल्ह्यांतील सहकारी संस्था

अहमदनगर येथें सहकारी दिन प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांच्या भाषणानें साजरा झाला. त्यावेळीं नगर जिल्ह्यांतील निरनिराळ्या तऱ्हेच्या सहकारी संस्थांचा तपशील व प्रमुख सहकारी संस्थांचीं चित्रें दाखविणारें १९५२-१९५३ सालचें कॅलेंडर सहकारी दिन समारंभ समितीतर्फे वांटण्यांत आलें. त्याचप्रमाणें, अहमदनगर जिल्ह्यांतील सहकारी संस्थांची व्याप्ति व वैशिष्ट्यें देणाऱ्या माहितीचें असि. रजिस्ट्रार श्री. रा. ह. देशपांडे ह्यांच्या सहीचें पत्रकहि सर्वांना वांटण्यांत आलें, तें येथे दिलें आहे.

अहमदनगर जिल्ह्यांतील सहकारी संस्थांची व्याप्ति व वैशिष्ट्यें

| | |
|---|---|
| १. जिल्ह्यांतील एकूण लोकसंख्या (२,८२,०५७ कुटुंबें) | १४,१०,२८५ |
| २. त्यापैकी ग्रामीण लोकसंख्या (२,०५,६०० कुटुंबें) | १०,२८,००० |
| ३. सर्व सहकारी संस्थांतील एकूण सभासद (३०-६-५२) | ७२,००० |
| ४. जिल्ह्यांतील सहकारी संस्थांची माहितीः— | |
| १ शेतकी पतपेढ्या | ५५६ |
| २ शेतकी बिनपतीच्या पेढ्या | ४९ |
| ३ शहरवासियांच्या पतपेढ्या | २७ |
| ४ हाऊसिंग सोसायटया | २८ |
| ५ औद्योगिक पतपेढ्या | ३३ |
| ६ कंझुमर्स स्टोअर्स | २४ |
| ७ सुपरवायझिंग युनियन्स | १५ |
| ता. ३०-६-५२ रोजीं एकूण सहकारी संस्था | ७३२ |

५. नगर जिल्ह्यांतील सहकारी चळवळीमधील वैशिष्ट्येंः-

१ अखिल भारतांत पहिला व एकमेव सहकारी साखर कारखाना. प्रवरा सहकारी साखर कारखाना लि., प्रवरानगर (लोणी).

२ मोठ्या बागाईतदारांसाठी विविध कार्यकारी संस्था.

३ मुंबई राज्यांतील नमुनेदार अर्बन बँक : नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदनगर.

मोसंबी ज्यूस फॅक्टरी व सहकारी छापखाना लवकरच निघत आहे.

रा. ह. देशपांडे
ॲसिस्टंट रजिस्ट्रार, को-ऑपरेटिव्ह सोसायटीज, अहमदनगर.

### सिनियर सेक्रेटरी ट्रेनिंग क्लासचा रिझल्ट

५० उमेदवारांपैकी १ प्रथम श्रेणींत, ८ द्वितीय श्रेणींत व २४ तृतीय श्रेणींत उत्तीर्ण झाले. त्यांचीं नांवें:-

**प्रथम श्रेणीः**—भा. भा. भावसार.

**द्वितीय श्रेणीः**—वि. र. शिंदे, वि. द. मोराणे, द्वा. रा. क्षत्रिय, सु. भा. गुजराथी, ग. ब. मोरे, ए. अ. लोहार, ज. के. गुजर, बा. रा. शहाणे.

**तृतीय श्रेणी**—म. चिं. मुळे, य. गं. साटेकर, मु. ता. शिंदे, भा. पां. कपोते, गो. ल. देशमुख, अ. शे. पिंजारी, पं. सा. कोटकर, द. ग. देवसे, म. ए. शहाणे, र. वा. गुजराथी, भ. ह. मगरे, रा. आ. जोशी, ए. दा. सोनार, शे. अ. निजाम, च. क. पाटील, रा. सं. सानप, रा. शं. वैद्य, पं. वि. भालेराव, म. रा. गोरे, पं. मु. देवरे, चिं. ता. जगताप, के. श्री. जाधव, जा. गं. ठेमगर, गो. रा. बैरागी.

एन्. वाय. कुलकर्णी
को. ट्रे. इन्स्पेक्टर, नाशिक

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८०३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.